# आरती श्री शनीमहाराजांची

आरती शनीमहाराजांची
आदित्यसुत ग्रहश्रेष्ठींची ॥धृ.॥

शुभ्र हिरण्यगर्भ पिता
गौर लावण्यखणी माता
कृष्ण कभिन्न परी झाला
पुत्र नाराज पिता म्हणूनी
आरती शनीमहाराजांची ॥१॥

संशये शापीले पत्नीला
तिलाही कृष्णवर्ण दिला
सवत्स केले परागंदा
कमाल अन्यायाची झाली
आरती शनीमहाराजांची ॥२॥

पुत्र मग तप घोर करी
महादेवाचा वर मिळवी
युद्धात पित्यालाही हरवी
परी त्यास गौरवूनी वंदी
आरती शनीमहाराजांची ॥३॥

मातेला न्याय मिळवून देती
शनीमहाराज दयाळू अती
विश्वाचा न्यायनिवाडा करती
बारा राशींशी विवाह करूनी
आरती शनीमहाराजांची ॥४॥

- नारायण
१०/२१/१८